## नि.दि.मु.क्र. ३३/२०१९ मधील निशाणी ६८ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज वादींनी वादपत्रात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. वादींचे असे म्हणणे आहे की प्रतिवादी क्र. १ ने दाव्यास कैफियत व तुर्तातुर्त ताकीदी अर्जाच्या कामी म्हणणे सादर केलेले आहे. त्या कैफियत आणि म्हणणेमध्ये प्रतिवादी क्र. १ ने दाव्याच्या परिच्छेद क्र. २ अनुक्रमांक ४ च्या दावा मिळकतीच्या सर्वे वर्णनामध्ये बदल झाल्याचे कथन केलेले आहे. वस्तुतः दावा दाखल करतेवळी वादींनी त्यावेळची स्थिती दर्शविणारे सातबाराचे उतारे हजर केलेले आहेत. मात्र दावा दाखल झाल्यानंतर उपरोक्त मिळकतीच्या सर्वे वर्णनामध्ये आकारफोडपत्रकामुळे बदल झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे दाव्यामध्ये दुरुस्ती करणे गरजेचे आहे. त्यासाठी दाव्याचे परिच्छेद क्र. २ मध्ये उपरोक्त मिळकतीबाबतचा मजकूर व आकारफोडपत्रकामध्ये झालेल्या विभाजना बाबतची कथने समाविष्ठ करुन वादी मागत आहे. सदरची दुरुस्ती दाव्याच्या परिणामकारक सुनावणीसाठी अत्यंत आवश्यक आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही. त्यामुळे सदर दुरुस्ती मंजूर व्हावी अशी वादींनी विनंती केली.

०३. सदर अर्जास प्रतिवादी क्र. १ ने त्याचे म्हणणे दाखल करुन तीव्र हरकत घेतली आहे. त्याचे असे म्हणणे आहे की वादींनी प्रस्तुत दावा प्रतिवादींना नाहक त्रास देणेसाठी दाखल केलेला आहे. सदरच्या दुरुस्तीमूळे वादी दाव्याच्या

मुळ स्वरुपामध्ये बदल करुन पाहत आहे. सबब वादींचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी त्याने विनंती केली.

०४. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांच्या युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०५. प्रस्तुत दावा वादीने ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरण हे तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जावर सुनावणीसाठी प्रलंबित होते. दाव्याची संपरिक्षा अद्यापपर्यत सुरु झालेली नाही. सबब, दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ मधील परंतुकेची बाधा प्रस्तुत अर्जास येणार नाही. वादी मागत असलेली दुरुस्ती ही प्रतिवादी क्र. १ ने दाखल केलेल्या कैफियतीनंतर करणे आवश्यक झाल्याचे वादींनी कथन केलेले आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ यांचे वादपत्र व कैफियतीतील कथने पाहिली असता दावा मिळकत क्र. ४ च्या सर्वे वर्णनामध्ये दावा दाखल झाल्यानंतर बदल झाल्याचे स्पष्ट होत आहे. दाव्याचा अंतिम निकाल करणेसाठी व परिणामकारक सुनावणीसाठी दावा मिळकतीचे योग्य वर्णन अभिलेखावर येणे आवश्यक आहे. वादी मागत असलेल्या दुरुस्तीमुळे वादींचे दाव्यात कोणत्याही स्वरुपाचा बदल होताना दिसुन येत नाही. अशा परिस्थितीत परिणामकारक न्यायादानासाठी वादी मागत असलेली दुरुस्ती उपयुक्त ठरणार आहे असे माझे स्पष्ट मत आहे. त्याचप्रमाणे सदरच्या दुरुस्तीमुळे प्रतिवादी क्र. १ यास कोणतही नुकसान होणारे नाही कारण प्रतिवादी क्र. १ दुरुस्तीच्या मजकुरावर अतिरिक्त कैफियत दाखल करु शकतो.

०६. वरील सर्व विवेचनावरुन माझे असे मत आहे की प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

वादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

वादींनी वादपत्रामध्ये प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी करावी व त्याप्रमाणे दुरुस्त वादपत्र सादर करावे.

अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ठ.

प्रतिवादी क्र. १ यास अतिरिक्त कैफियत देण्याची मुभा देण्यात येते.

Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2019.11.16 17:52:25 +0530

दि. १६/११/२०१९ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER

| | |
|---|---|
| Name of the PO | Shri. Bhanupratap Chouhan |
| Date of pronouncement | 16/11/2019 |
| Order signed by PO on | 16/11/2019 |
| Order uploaded on | 18/11/2019 |